महाराष्ट्र शासन वन विभाग
संजय गांधी राष्ट्रीय उद्यान बोरीवली
वाहन विक्री निविदासाठी जाहिरनाम

तमाम इच्छुक खरेदीदारांना कळविण्यात येते की, संजय गांधी राष्ट्रीय उद्यान बोरीवली वनविभागातील निर्लेखित केलेल्या वाहनांचा लिलाव जेथे जसा आहे त्या तत्वावर निविदा पध्दतीने लिलाव दिनांक १४/०३/२०१७ रोजी दुपारी १५-०० वाजता मुख्य वनसंरक्षक व संचालक, संजय गांधी राष्ट्रीय उद्यान, बोरीवली यांचे कार्यालयात करण्यात येणार आहे.

| अ.क्र. | वाहन ठेवलेले ठिकाण | वाहन प्रकार | वाहनाचा दर्शनी नोंदणी क्र. | शेरा |
|---|---|---|---|---|
| १ | विभागीय कार्यालय स.गा.रा.उ. बोरीवली (पुर्व) मुंबई-६६ | जीप | एम.एच.-०२ - जे.ए. -८७७४ | वाहनाचा तपशिल ढोबळ मानाने दिलेला आहे. तरी वाहन प्रत्यक्ष पाहुन निविदा देणा-यांनी निविदा भराव्यात. |

१) वाहने दि ०६/०३/२०१७ ते ०९/०३/२०१७ या कालावधील (सुटटीचे दिवस सोडून) वन नमुद केलेल्या ठिकाणी प्रत्यक्ष पाहता येतील. निविदा पत्रकाची किंमत प्रत्येकी रु.२५०/- राहील.
२) निविदा स्विकृतीसाठी निविदापेटी दिनांक १४/०३/२०१७ रोजी सकाळी १०.०० ते दुपारी १४-०० वाजेपर्यन्त कार्यालयात ठेवणेत येईल.

निविदा विक्रि दिनांक ०६/०३/२०१७ ते १०/०३/२०१७ या कार्यालयीन कामकाजाचे दिवशी कार्यालयीन वेळेत मुख्य वनसंरक्षक व संचालक, संजय गांधी राष्ट्रीय उद्यान, बोरीवली यांचे कार्यालयात रु. २५०/- (दोनशे पन्नास रुपये मात्र) प्रति निविदा या (नापरतावा) किमतीस उपलब्ध होतील. निविदा सोबत खरेपणासाठी इसारा म्हणून रक्कम रु. ५०००/- (रुपये पाच हजार मात्र) चा मुख्य वनसंरक्षक व संचालक, संजय गांधी राष्ट्रीय उद्यान बोरीवली वा Chief Conservator of Forest & Director, Sanjay Gandhi National Park Borivali यांना देय असा कोणत्याही राष्ट्रीयकृत बँकेचा ठाणे शाखेवरील डिमांड ड्राप्ट जोडणे आवश्यक आहे. इसारा रक्कमे शिवायचे निविदा पत्रक विचारांत घेतली जाणार नाहीत.

लिलाव शर्ती, नियम हे कार्यालयीन वेळेत व कामाचे दिवशी मुख्य वनसंरक्षक व संचालक, संजय गांधी राष्ट्रीय उद्यान, बोरीवली यांचे कार्यालयात पाहावयास मिळतील.

ठिकाण :- बोरीवली
दिनांक :-५ मार्च २०१७

—Sd—
मुख्य वनसंरक्षक व संचालक,
संजय गांधी राष्ट्रीय उद्यान
बोरीवली

महाराष्ट्र शासन
संजय गांधी राष्ट्रीय उद्यान बोरीवली वनविभाग
वाहन विक्रि बाबत सविस्तर अटी व शर्ती :

संजय गांधी राष्ट्रीय उद्यान बोरीवली वनविभगाकडील निर्लेखित केलेल्या वाहनांची निविदा पध्दतीने विक्री मुख्य वनसंरक्षक व संचालक, संजय गांधी राष्ट्रीय उद्यान, बोरीवली हे विभागीय कार्यालयांत दिनांक १४/०३/२०१७ रोजी करणार आहेत. सदरची वाहने जेथे आहे जसे आहे त्या स्थितीत विक्री करण्यात येणार आहे. ज्यांना लिलावात वाहने खरेदी करावयाची आहेत त्यांनी मुख्य वनसंरक्षक व संचालक संजय गांधी राष्ट्रीय उद्यान, बोरीवली येथील कार्यालयात ठेवण्यात येणा-या निविदा पेटीत दिनांक १४/०३/२०१७ रोजी सकाळी १०.०० ते दुपारी १४-०० वाजेपर्यन्त माहोरबंद निविदा टाकावी. शक्य झाल्यास निविदा त्याच दिवशी दुपारी ठिक १५-०० वाजता उघडण्यात येतील.

वाहनांचे लिलांवाबाबत सविस्तर निविदा सूचनेच्या अटी व शती खालील प्रमाणे :

१) सदरची वाहने जेथे आहे जसे आहे त्या स्थितीत विक्री करण्यात येतील. निविदा भरणेपूर्वी निविदाकाराने जागेवर वाहनांची प्रत्यक्ष पाहणी करून नंतरच निविदा भरली आहे असे समजण्यात येईल. निविदा दिल्यानंतर कोणतीही तक्रार ऐकली जाणार नाही.
२) कोरे निविदा फार्म किंमत रु.२५०/- (रुपये दोनशे पन्नास मात्र) रोखीने भरले असता विभागीय कार्यालयांत सुटटीचे दिवस सोडून कार्यलयीन कामकाजाचे दिवशी कार्यालयीन वेळेत दिनांक ०६/०३/२०१७ ते १०/०३/२०१७ दरम्यान मिळू शकतील.

३) प्रत्येक वाहनासाठी स्वतंत्र निविदा फॉर्म वापरणे जरुरीचे आहे.

४) प्रत्येक निविदा फॉर्मसमवेत निविदेच्या खरेपणासाठी तारण म्हणून मुख्य वनसंरक्षक व संचालक संजय गांधी राष्ट्रीय उद्यान, बोरीवली (Chief Conservator of Forest & Director, Sanjay Gandhi National Park, Borivali) यांचे नावाचा आवश्यक रक्कमचा कोणत्याही राष्ट्रीयकृत बँकेचा ठाणे शाखेवरील डिमांड ड्राफ्ट जोडणे आवश्यक आहेत.
५) वाहन खरेदी व्यवहारांत ज्यांची नांवे काळया यादीत समाविष्ट आहेत अशांना निविदा भरता येणार नाहीत. अशा व्यक्तींना/ कंपनी / संस्थेनी निविदा दिली असल्यास व तसे निदर्शनास आल्यास त्या स्विकृत केल्या जाणार नाहीत.
६) निविदा देणारे भागीदार, कंपनी अथवा संस्था असल्यास तसे मुखत्यार पत्र निविदा देणा-याचे नांवे दिलेले असले पाहिजे व ते निविदासोबत जोडणे आवश्यक आहे.

**७) निविदेच्या मोहेरबंद लखोटयावर वाहन क्रमांक ---------------------------- साठी निविदा असा स्पष्ट उल्लेख करावा.**
८) निविदा उघडल्याचे दिवसापासून १ महिन्यांचे आत निविदा स्विकृत केल्याबाबत खरेदीदारास कळविणेत येईल. ज्यांच्या नावाने निविदा मंजूर करणेत येईल त्यांनी मंजूर केलेल्या तारखे पासून १५ दिवसांच्या आत संपुर्ण लिलाव रक्कम त्यावरील विक्रीकर व इतर करांचा भरणा करावा लागेल. संपुर्ण लिलांव रक्कम लिलाव रक्कमेवर प्रचलित दराप्रमाणे देय होणारा मुल्य वर्धीत कर व इतर करांचा भरणा करावा लागेल.

९) निविदा मंजुर झाल्यानंतर लिलावांत काढलेल्या वाहनाची अथवा त्यांच्या कोणत्याही भागांची, संरक्षणा बाबतची जबाबदारी या विभागावर राहणार नाही. तसेच संपुर्ण रक्कमेचा करासहीत भरणा केल्यानंतर वाहनांचा ताबा मिळल्याची पोहोच देऊन ते वाहन त्यांनी त्वरीत जागेवरुन स्वखर्चाने वाहुन न्यावे लागेल.

१०) लिलांव मंजुर झाल्यानंतर विहित मुदतीत पुर्ण लिलांव रक्कम व करांची रक्कम न भरल्यास सदर वाहनांचा फेंरलिलाव ज्याचे नांवाने निविदा मंजुर झालेली आहे त्यांचे जोखमीवर केला जाईल. सत्यांची भरलेली अनामत रक्कम सरकारजमा केली जाईल. फेरलिलाव करुन येणारी रक्कम कमी असल्यास ज्यांच्या नावाने पहिल्यांदा निविदा मंजुर झाली आहे. त्यांचेकडून जमिन महसुलाची थकबाकी म्हणून किंवा अन्य मार्गाने वसुल केली जाईल. फेरलिलांवात जर पहिल्या रक्कमेपेक्षा जास्त रक्कम आली तर त्या जादा रक्कमेवर ज्यांचे नांवे पहिल्यांदा लिलांव झाले आहे. त्याचा कोणत्याही प्रकारे हक्क राहणार नाही.
११) निविदाकराने निविदा भरुन पेटीत टाकल्यानंतर ती त्यास परत घेण्याचा हक्क राहणार नाही.

१२) निविदा फॉर्म मध्ये नमुद केलेली रक्कम ही निव्वळ लिलाव रक्कम समजण्यात येईल व त्यावरील सर्व देय कर वेगळे भरावे लागतील.

१३) कोणतेही कारण न दर्शविता निविदा मंजुर अगर नामंजुर करण्याचा हक्क मुख्य वनसंरक्षक व संचालक, संजय गांधी राष्ट्रीय उद्यान बोरीवली यांचा राहील.

१४) ज्या निविदाकाराची निविदा स्विकारली जाणार नाही त्यांची अनामत रक्कम बिनाव्याजी परत करणेत येईल.

१५) लिलाव रक्कम व इतर कर भरणेबाबत कोणतीही मुदतवाढ दिली जाणार नाही.

१६) कोणाही इच्छुक निविदाकारास निविदा देणेपूर्वी वाहनांचे कागदपत्रांची अथवा इतर काही माहिती आवश्यक असल्यास ती त्यांनी दिनांक ०७/०३/२०१७ ते दिनांक ०९/०३/२०१७ पर्यन्त कार्यालयांत येऊन पहावी. मात्र कोणतीही शंका अथवा वादग्रस्त बाबी असल्यास त्या निविदा स्विकरणाच्या दिवशी म्हणजेच दिनांक १४/०३/२०१७ रोजी उपस्थित करता येणार नाहीत व त्यांची दखल घेतली जाणार नाही.

१७) सदर वाहनाची परिवहन विभागकडील थकबाकी असल्यास यशस्वी बोलीदारास भरावी लागेल.

१८) प्रस्तुत प्रकरणी कोणतीही तक्रार अथवा शंका उपस्थित झाल्यास त्या बाबतीत मुख्य वनसंरक्षक व संचालक, संजय गांधी राष्ट्रीय उद्यान, बोरीवली यांचा निर्णय अंतिम व बंधनकारक राहील.

१९) प्रादेशिक परिवहन विभागाचे नियम/ अटी/ शर्ती च्या अधिन राहून वाहनांची नोंदणी करुन घेणेची जबाबदारी खरेदीदारावर राहील त्या करीता लागणारे आवश्यक ते सहकार्य वन विभागाकडून केले जाईल. खरेदी वाहनाचे परिवहन विभागाकडील नोंदणी, हस्तांतरण कार्यवाहीची जबाबदारी खरेदीदाराची राहणार असून वनविभाग संबंधी आवश्यक प्रमाणपत्रे प्रपत्रे देणार असून छापील नमुने वगैरे आणण्याची जबाबदारी खरेदीदाराची राहील.

२०) अपवादात्मक परिस्थितीत जे लिलाव दोनवार करण्यात येतील त्या लिलावाचे परिणाम अंतिमरित्या प्रसिध्द होईपर्यन्त त्या निविदा रक्कमेस निविदाकार बांधील राहतील.

२१) सदर निविदा पत्रकांत वाहना करीता देऊ केलेली किंमत अक्षरी व अंकांत सुस्पष्ट व कोणत्याही प्रकारची खाडाखोड गिरवा गिरवी केलेली नसावी. रक्कम पूर्णांकांत असावी निविदापत्रकात रक्कम अंकी व अक्षरी सुस्पष्ट नसल्यास पूर्ण निविदा नाकारणेचा संबंधित प्राधिका-याचा हक्क राहील.

२२) या पुर्वी म्हणजेच दि.०८/०८/२०१४ रोजी ज्या लिलावधारकांनी निविदा पध्दतीने वाहन विकत घेतलेले आहे व वेळोवेळी कळवून देखील वाहनाची रक्कम अदा करुन वाहन ताब्यात घेतलेले नाही अशा व्यक्तींना निविदा विकत घेता येणार नाही याची नोंद घ्यावी.

२३) कोरी निविदा विकत घेताना, स्वत:चे ओळखपत्र म्हणुन पॅन कार्ड, आधार कार्ड, वाहन चालविण्याचा परवाना, मतदान ओळख पत्र, राष्ट्रीयकृत बँकेचे पासबुक इत्यादींची छायांकित प्रत व त्यावरी स्वत:ची स्वाक्षरी करुन या कार्यालयात सादर केल्यानंतरच कोरी निविदा रुपये २५०/- (रुपये दोनशे पन्नास मात्र) देण्यात येईल.

२४ लिलावांत ठेवलेल्या वाहनांपैकी कोणतेही वाहन अगर सर्वच्या सर्व वाहने कोणतेही कारण न देता लिलावातून कोणत्याही टप्प्यावर वगळणेचा हक्क मुख्य वनसंरक्षक व संचालक यांचा राहील.

२५) निविदाकार शासनाचे थकबाकीदार, गुन्हेगार नसावेत. तथापि तसे सिध्द झाल्यास त्यांचे निविदापत्रक कोणत्याही क्षणी रद होऊन इसारा रक्कम सरकार जमा होणेस पात्र राहील.

वरील अटी व शर्तीमध्ये काही बदल झाल्यास अथवा काही नवीन अटींचा अंतर्भाव झाल्यास त्याची प्रसिध्दी विभागीय कार्यालयाचे सुचना फलकावर करण्यात येईल व ती निविदाकारांवर बंधनकारक राहील

निविदाकार यांची स्वाक्षरी

—Sd—

मुख्य वनसंरक्षक व संचालक,
संजय गांधी राष्ट्रीय उद्यान
बोरीवली

वाहन विक्रसाठी निविदा क्र. /२०१७-१८ किंमत रु. २५०/-

१) निविदा सुचना :- पान क्र. १

२) सविस्तर अटी व शर्ती :- पान क्र. २ व ३

३) निविदा दर :- पान क्र. ४

*********************************************************************************

श्री. ---------------------------------------------------- यांना दिले, दि.

-sd-
मुख्य वनसंरक्षक व संचालक,
संजय गांधी राष्ट्रीय उद्यान
बोरीवली